पिजिए ३१/२०२० पान क्र. ४ निशाणी क्रमांक यु–७

सरतपास श्री. खेळकर वकील मार्फत अर्जदारातर्फे :–

८. आता मला शपथपत्र नि.क्र. यु– ७ दाखविले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर माझ्या सांगितल्याप्रमाणे खरा व बरोबर आहे.

उलटतपासणी श्री. जयपाल पाटील वकील गैरअर्जदार तर्फे:–

हे म्हणणे खरे आहे की, मी दाखल केलेला नि.यु.११ नुसार माझी नियुक्ती सहा महिन्याकरीता करण्यात आली होती. हे म्हणणे खरे नाही की सदर आदेशानुसार माझी नियुक्ती ही कामाच्या उपलब्ध्दतेनुसार व गरजेनुसार करण्यात येईल असे नमुद आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला दि. १२/०२/१९८६ रोजी दि.२१/०५/१९८४ पासुन सि.आर.टि.वर घेण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की, दि. २०/०५/१९८४ पर्यंत माझी सेवा अस्थायी स्वरूपाची होती. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर मला दि. १५/१०/१९९४ रोजी विजतंत्री म्हणुन नियुक्ती देण्यात आली. हे म्हणणे खरे आहे की, नि. यु.१३ वरील दि.१७/०८/१९९० च्या जि.आर. सोबत जोडलेल्या अनुसुचीनुसार पंप ऑपरेटर यांची वेतनश्रेणी ही २५०–४३५ एवढी नमुद केलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, नि.यु.१३ वरील जि.आर. नुसार पंप ऑपरेटरची वेतन श्रेणी ही २५०–४३५ एवढी होती. हे म्हणणे खरे नाही की, मी विभागाला असे वचन पत्र लिहुन दिले होते की, चुकीच्या वेतननिश्चितीमुळे अतीप्रदान झाल्यास तशी भविष्यात येणा–या रक्कमेतुन समायोजीत करून शासनास परतफेड करील. आता मला प्रकरणामध्ये दाखल दि.१२/०९/२००९ रोजीचे जोडपत्र दोन मधील वचनपत्र दाखविले. सदर वचनपत्र मी दिलेले आहे त्यावर माझी सही आहे. त्यातील मजुर बरोबर आहे. त्यास **नि. सि.९** देण्यात येते. आता मला प्रकरणामध्ये दाखल दि. १५/०९/०१० रोजी मी वेतन निश्चितीचा विकल्प देण्याबाबत दिलेले पत्र दाखविले त्यावर माझी

सही असुन त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.सि.१०** देण्यात येते. आता मला प्रकरणामध्ये दाखल दि.१०/०६/१९९९ रोजीचे जोडपत्र दोन मधील वचनपत्र दाखविले सदर वचनपत्र मी दिलेले आहे त्यावर माझी सही आहे. त्यातील मजुर बरोबर आहे. त्यास **नि. सि.११** देण्यात येते. साक्षदार स्वतः सांगतो की सदर लिहुन घेण्याची पध्दत असल्यामुळे मी लिहुन दिलेले होते. हे म्हणणे खरे नाही की, नि.यु.१३ वरील जि.आर.नुसार माझी वेतनश्रेणी २५०—४३५ एवढी होती हे मला माहित होते. हे म्हणणे खरे नाही की, माझे नियुक्ती आदेशामध्ये माझा वेतनश्रेणी चुकीने २६०—४९५ एवढी नोंद करण्यात आली होती. हे म्हणणे खरे आहे की, एखादी चुक झाल्यास दुरूस्ती करता येते. माझे सेवानिवृत्तीची तारीख ३०/०६/२०१२ ही आहे. हे म्हणणे खरे आहे की, ज्यावेळेस मी सेवानिवृत्त झालो त्यावेळेस मला मिळालेले आर्थिक फायदे मिळाल्यानंतर त्यावेळेस त्याबाबत मी आक्षेप घेतला नाही. हे म्हणणे खरे आहे की, ३०/०६/२०१२ नंतर आठ वर्षानंतर मी प्रकरण दाखल केले. साक्षदार स्वतः सांगतो की, कारण त्यामध्ये माझे पत्रव्यवहार चालु होते. मी कोणकोणत्या तारखेला पत्रव्यवहार केले ते मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी माझे बयानामध्ये नमुद दि.२८/११/२०१८ चे कोणतेही निवेदन अभिलेखावर दाखल केले नाही. हे म्हणणे खरे आहे की, नि.यु.१७ वरील दि.२८/११/२०१८ वरील निवेदन हे मी दि.२९/११/२०१८ ला दिले. हे म्हणणे खरे नाही की, पर्यावरण अभियंता डिव्हिजन चंद्रपुर यांनी मला जो नियुक्ती आदेश दिला होता त्यामध्ये वेतनश्रेणी २६०—४९५ चुकीने नमुद केलेली होती.

हे म्हणणे खरे नाही की, माझी पुन्हा वेतननिश्चिती करण्यात आली होती. हे म्हणणे खरे आहे की,

त्यावेळेस मला जास्तीचे वेतन निश्चित केल्यामुळे त्यानंतर माझी योग्य वेतन निश्चीती करून योग्य मोबदला देण्यात आला होता. हे म्हणणे खरे आहे की, आमचे विभागामध्ये एखादया कर्मचा—यास अतिरिक्त रक्कम प्रदान झाल्यास त्या कर्मचा—याने सदर अतीरिक्त प्रदान रक्कम प्रदान करणे गजजेचे असते. हे म्हणणे खरे आहे की, मला अतीरीक्त प्रदान रक्कम रू.९२४१२/— चे समायोजन मला मिळणा—या उपदानाच्या रक्कमेतुन करून मला उर्वरीत उपदानाची रक्कम देण्यात आली. हे म्हणणे खरे आहे की, मला एम.सि.एस.आर. सेवानिवृत्तीचे नियम लागु होतात. हे

म्हणणे खरे आहे की,त्यानुसार कार्यालय प्रमुखांना तशी रक्कम कपात करण्याचे अधिकार आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यानुसार रक्कम रू.९२४१२/– रू.ची कपात करण्यात आली होती. हे म्हणणे खरे नाही की, मला जास्तीचे वेतनश्रेणी देण्यात असतांनाही त्याबाबत मी विभागाला माहिती दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला उपदानाची रक्कम कमी मिळाल्याबाबत मी विभागाला विहीत कालावधीमध्ये निवेदन दिलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, तसे विविध कालावधीमध्ये दिलेले निवेदन मी प्रकरणामध्ये दाखल केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, अभिलेखावर मी २०१९ पुर्वीचा केलेला पत्रव्यवहार दाखल केलेला नाही. व त्याबाबतचा उल्लेख मी माझे अर्जामध्ये व पुराव्यामध्ये केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे उशीरामाफीच्या अर्जामध्ये मी ४ महिने ६ दिवस प्रकरण दाखल करण्यास उशीर झाला हे बेकायदेशीर नमुद केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, ८ वर्ष प्रकरण दाखल करण्यास उशीर झाल्याबाबतचे सयुक्तीक कारण मी माझे अर्जामध्ये नमुद केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपासणी पुर्ण.

फेर तपासणी नाही.

माझे समक्ष

स्वाक्षरी

(श्रीमती रू.वि. मेटे)
न्यायाधीश
कामगार न्यायालय, चंद्रपुर

दि. १३.०६.२०२४.